# आपलं संविधान




## संविधान जागर अभियान

**लोकेच्छेतून जन्माला आलंय संविधान !**
**होय, माणूस म्हणून आम्हाला मान्यता दिलीय त्यानं...**
**होय, स्वातंत्र्य, समता व बंधुतेचं लेणं दिलंय त्यानं...**
**होय, न्याय आणि सामाजिक न्याय दिलाय त्यानं...**
**होय, तुटक्या धाग्याचं एक वस्त्र विणलंय त्यानं...**
**आम्ही ऋणी आहोत संविधानाचे...**
**रक्षणासाठी कटिबद्ध आहोत त्याच्या...**
**संविधानाच्या पंच्याहत्तरीनिमित्त हीच आमची प्रतिज्ञा...**

**प्रकाशक:**
**संविधान जागर अभियान**
(मा. न्या. बी.जी. कोळसे पाटील, तुषार गांधी, प्रा. डॉ. सुखदेव थोरात, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, उत्तम कांबळे, धनाजी गुरव, नीरज जैन)

**संपर्क पत्ता:** 15, गार्डन लेआऊट, बेझॉनबाग, नागपूर, महाराष्ट्र – 440 014

**मुद्रक:** आर.एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे – 411 030

स्वप्निल फुसे: 79723 45764
नागार्जुन वाडेकर: 98602 39899
राजाभाऊ करवाडे: 98222 02739

सामाजिक विषयांवर माहिती मिळवण्यासाठी व्हॉट्सअप क्यूआर कोडला स्कॅन करा!

**सहयोग मूल्य ₹15/-**

# आपण सगळे भारतीय आहोत

## भारत हे आपले घर आहे.

आपण इथे राहतो, काम करतो, खेळतो
आणि इथेच घडतो.

आपल्या स्वप्नांना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

आपण सर्व भारतीय एका कुटुंबासारखे आहोत.

आपण एकमेकांवर अवलंबून आहोत.

आपल्याला एकमेकांची काळजी घेतली पाहिजे.



# भारत

## ही आपली सामूहिक जबाबदारी आहे

आपल्या देशाला कोणत्या दिशेने नेले पाहिजे?

आपले हक्क आणि कर्तव्ये काय आहेत?

कायदेमंडळ, प्रशासन, न्यायपालिका आणि माध्यमे यांसारख्या विविध संस्थांनी कशा प्रकारे काम केले पाहिजे?

## या सगळ्या प्रश्नांची उत्तरे भारतीय संविधान देते




## भारतीय संविधान

## हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे

# आपल्या भूतकाळातील सर्वोत्तम आणि समृद्ध विचार भारतीय संविधानात सामावलेले आहेत.



भगवान महावीर, भगवान गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा, संत नामदेव, संत रविदास, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, संत विवेकानंद यांसारख्या युगप्रवर्तक संतांच्या स्वातंत्र्य-समता-बंधुतेच्या विचारांनी आपली राज्यघटना समृद्ध झाली आहे.
छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि शाहू महाराज यांनी ही मूल्ये आत्मसात करून ती समाजात रुजवली.

हाच विचार अनेक समाजसुधारकांनी येथील मातीत रुजवला. याच मुल्यांनी महात्मा गांधी, पं. नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मौलाना आज़ाद, भगतसिंग आणि इतर अनेक नेत्यांच्या नेतृत्वाखालील आपल्या स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली.



# आपला स्वातंत्र्यलढा म्हणजे

## एक सामाजिक क्रांती

गरिबी, विषमता, निरक्षरता आणि महिलांवर, शोषित जातींवर, आदिवासींवर होणारे अन्याय संपवण्यासाठी

## एक आंदोलन

शोषितांना सशक्त आणि मुक्त करण्यासाठी



## एक सामूहिक प्रयत्न

प्रचंड विविधता असलेल्या भारताला एकत्र बांधण्यासाठी

## एक लढा

द्वेष आणि हिंसा त्यागून परिवर्तन घडवण्यासाठी

# संविधान कसे तयार झाले?

भारतीय समाजातील प्रत्येक प्रांत, धर्म, वर्ग, भाषा आणि संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे **300 सदस्य** संविधान सभेत होते. या सभेने 9 डिसेंबर 1946 ते 26 नोव्हेंबर 1949 या कालावधीत संविधान तयार केले.



**अध्यक्ष:** डॉ. राजेंद्र प्रसाद

**मसुदा समितीचे अध्यक्ष:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## स्वातंत्र्यदिन – 15 ऑगस्ट 1947

आपण स्वतंत्र झालो.

## प्रजासत्ताक दिन – 26 जानेवारी 1950

आपण संविधान स्वीकारले आणि आपल्या देशाचा भविष्यातील मार्ग निश्चित केला.

# संविधानाचा आत्मा: उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय**;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य**;
दर्जाची व संधीची **समानता**;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# आम्ही भारताचे लोक

हे संविधान
स्वत:ला
अर्पण करत
आहोत;

त्याच्या निर्मितीत
प्रत्येक भारतीयाचा
सहभाग आहे;



प्रत्येक
भारतीयाचा
त्यावर समान
अधिकार आहे;

ती व्यक्ती
मग कोणत्याही
वय, धर्म, जात, लिंग,
प्रांत, भाषा, श्रीमंत किंवा
गरीब आर्थिक स्तर अथवा
इतर कोणत्याही स्तरातील असो.

# सार्वभौम

**देश कसा चालवायचा आहे हे आपण ठरवू.**

**कोणताही राजा, धर्मग्रंथ किंवा परदेशी शासक नाही.**

**आपणच या देशाचे खरे मालक आहोत.**



**आपणच सरकारची निवड करतो, ज्यांचे काम लोकांची सेवा करणे आहे.**

# समाजवाद

## देशाची जल, जंगल, जमीन

**यावर प्रत्येक भारतीयाचा हक्क आहे,**
**ती थोड्या लोकांच्या हातात केंद्रित होऊ नये.**



**आपल्या देशाची संपत्ती सर्वांच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे, विशेषतः गरिबांसाठी आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी.**

# धर्मनिरपेक्षता



प्रत्येक भारतीयाला आपल्या पसंतीचा धर्म स्वीकारण्याचे किंवा कोणताही धर्म न स्वीकारण्याचे स्वातंत्र्य आहे. सरकार सर्व धर्मांना समान व न्याय्य वागणूक देईल.

# लोकशाही

**‘एक व्यक्ती – एक मत, एक मत – समान पत’**

**या तत्वावर सर्व निर्णय घेतले जातात.**

**लोक आपले प्रतिनिधी निवडतात, जे त्यांच्यावतीने निर्णय घेतात.**



**भारत हा जगातील पहिला देश आहे ज्याने संविधान लागू झाल्याबरोबर महिलांसह सर्व प्रौढ नागरिकांना मतदानाचा हक्क दिला.**

# राजकीय न्याय

## लोकांनी राजकीय प्रक्रियेत सक्रियपणे सहभाग घ्यावा



महानगरपालिका

## ‘हमारा गाव, हमारा राज’

## या तत्वाप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केल्या



# आर्थिक न्याय

## सरकारने यासाठी कसोशीने प्रयत्न करावेत:

प्रत्येकाला सन्मानपूर्वक
रोजगार मिळेल
असा प्रयत्न करणे






**संपत्तीचे
केंद्रीकरण होऊ नये
याची काळजी घेणे**

सर्व नागरिकांना
चांगली आरोग्यसेवा आणि
पोषण उपलब्ध करून देणे





सर्व मुलांना
समान व गुणवत्तापूर्ण
शिक्षण देणे

# सामाजिक न्याय

महिलांनाही पुरुषांप्रमाणे
समान व न्याय्य
वेतनाचा हक्क आहे





दलित, आदिवासी, भटके विमुक्त आणि इतर मागासवर्गीयांना – ज्यांचे शतकानुशतके शोषण केले गेले होते – समाजाच्या इतर घटकांसोबत समान स्तरावर आणण्यासाठी

**संविधानाने 'आरक्षणा'ची तरतूद केली आहे**

# स्वातंत्र्य



लोकांना त्यांच्या इच्छेनुसार जीवन जगण्याचे, विचार करण्याचे, प्रेम करण्याचे, प्रार्थना करण्याचे, बोलण्याचे, मतभेद व्यक्त करण्याचे, खाण्याचे, कपडे घालण्याचे आणि काम करण्याचे स्वातंत्र्य असावे; असे करताना इतरांना हानी होणार नाही याची काळजी घेणे.

# दर्जाची व संधींची समानता

## संविधान याची हमी देते की:

**लिंग, जात, धर्म, वंश, जन्मस्थान यांच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही**

**सामाजिक आणि आर्थिक समानतेकडे वाटचाल करण्यासाठी सरकार पावले उचलेल**



# बंधुता

**आम्ही एकमेकांची भावंडांप्रमाणे काळजी घेऊ. आम्ही भाषा, संस्कृती, अन्न, पेहराव, पूजा विधी यांमधील विविधतेचा सन्मान करू.**



# संविधानाचे यश

## अनेक भारत एक भारत

परंपरा, संस्कृती, भाषा, जात, धार्मिक श्रद्धा, खाद्यपदार्थ इत्यादींमध्ये वेगळेपण असलेल्या **4,000** हून अधिक समुदायांनी भारत देश बनलेला आहे.





युरोपातील देश त्यांची भाषा, संस्कृती वेगळी असल्याने वेगवेगळ्या देशांमध्ये विभागले गेले आहेत.



सोव्हिएत युनियनचेही असेच झाले.



इतर देश दुभंगले, पण

**भारत एकसंध राहिला**

कारण

**संविधानाने विविधतेचा सन्मान केला.**

# संविधानाचे यश

## लोकशाही भारत

दुसऱ्या महायुद्धानंतर नव्याने स्वतंत्र झालेले
बहुतांश देश हुकूमशाही, लष्करी बंड, यादवी युद्धे
यांसारख्या संकटांचे बळी ठरले आहेत.

म्यानमार
थायलंड



पाकिस्तान
इंडोनेशिया

परंतु स्वातंत्र्यानंतर 75 वर्षांनंतरही
**भारतात लोकशाही कायम राहिली आहे.**



# गरिबांसाठी संविधान

**प्रत्येक मुलाला मोफत आणि चांगल्या दर्जाचे शिक्षण,**
**सर्व नागरिकांना परवडणारी आरोग्य सेवा आणि अन्नसुरक्षेची हमी.**

## स्वातंत्र्यानंतर सरकारने प्रत्येक गावात



शाळा
उघडल्या

आरोग्य केंद्रे
उघडली





गरिबांना अन्न
पुरवण्यासाठी
रेशन व्यवस्था
सुरू केली

# शेतकऱ्यांसाठी संविधान

## स्वातंत्र्याअगोदर



सर्व शेतजमीन जमीनदार आणि सावकारांच्या मालकीची

**शेती उद्ध्वस्त** – दुष्काळात लाखो लोक मृत्युमुखी

## स्वातंत्र्यानंतर

### जमीन शेतकऱ्यांमध्ये वाटली गेली;

बी-बियाणे, कीटकनाशके, सिंचन सुविधा, वीज, खते, स्वस्त दरात बँक कर्ज उपलब्ध करून दिले.



पिकाला चांगला भाव मिळण्यासाठी, सरकारने शेतकऱ्यांकडून पीक खरेदी करण्याची व्यवस्था सुरू केली.

# युवक आणि कामगारांसाठी संविधान

## स्वातंत्र्याअगोदर



ब्रिटिशांनी भारतातले
**सर्व उद्योग नष्ट केले**
**शहरे उद्ध्वस्त केली**

## स्वातंत्र्यानंतर

**रोजगाराची संधी, आणि मेहनतीच्या योग्य मोबदल्याची हमी.**
**सार्वजनिक क्षेत्राची उभारणी, लघु उद्योगांना प्रोत्साहन,**
**मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती.**



**कामगारांचे संरक्षण करणारे कायदे**

- युनियन बनवण्याचा हक्क
- भविष्य निर्वाह निधी
- 8 तास काम
- पेन्शन



# संविधानाचे यश

## दलित, आदिवासी, भटके विमुक्त आणि इतर मागासवर्गीयांचे सशक्तीकरण.




शतकानुशतके शोषित आणि उपेक्षित असलेल्या समाजातील लोक संविधानामुळे शिक्षक, डॉक्टर, अभियंते, व्यवस्थापक, सशस्त्र सेना अधिकारी, राजकारणी, अगदी मुख्यमंत्री तसेच भारताचे राष्ट्रपतीही बनू शकले.

# संविधानाचे यश

## महिला सबलीकरण

### संविधान: पुरुष आणि महिलांना समानता



महिलांना छळ आणि भेदभावापासून संरक्षण देण्यासाठी अनेक कायदे.

मुलांच्या बरोबरीने मुलींनाही शाळा-कॉलेजांमध्ये शिक्षण.

महिला अभियांत्रिकी, व्यवस्थापन, अर्थ, प्रशासन, पोलीस आणि संरक्षण दल, क्रीडा, राजकारण इत्यादी क्षेत्रांमध्ये.



# मूलभूत कर्तव्ये

भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता
उन्नत ठेवणे व त्याचे संरक्षण करणे;

धर्म, भाषा, प्रांत, लिंग या भेदांच्या पलीकडे जाऊन
जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे;

स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या
प्रथांचा त्याग करणे;

आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे जतन करणे;

विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा विकास करणे;


पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे;

सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे
व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

**याचे पालन करणे हेच खरे देशप्रेम.**

# महात्मा गांधींचा शासनकर्त्यांसाठी ‘मंत्र’:

“जेव्हा तुम्ही गोंधळलेले असाल आणि काय निर्णय घ्यायचा हे तुम्हाला कळत नसेल, तेव्हा तुमच्या आयुष्यातल्या सर्वात गरीब, अशक्त, दुबळ्या माणसाला आठवा आणि तुमचे पाऊल त्याच्यासाठी आहे ना, याची खात्री करा.”



**या भावनेचा आदर करणे म्हणजेच संविधानाचे पालन करणे होय!**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
# आपल्या अधिकारांविषयी...

“कायदा हा जनतेच्या अधिकारांचा पाठीराखा असतो ही चुकीची समजूत आहे. इतिहास सांगतो की कायदा नाही, तर सामाजिक चेतना आणि सद्सद्विवेक बुद्धी हे आपल्या हक्कांना अबाधित ठेवतात. जर समाजात लोकशाहीची चेतना नसेल आणि ह्या अधिकारांना समाज जुमानत नसेल, तर कोणताही कायदा आणि शासन व्यवस्था लोकांचे अधिकार त्यांना मिळवून देऊ शकत नाही.”



**सामाजिक चेतना हीच आपल्या अधिकारांची एकमेव हमी आहे.**

# चला सारे, निर्धार करूया...




लोकशाहीत
आरंभ, मध्य आणि शेवट
**संविधानच असतं**
आणि तेच असतं आपलं जगणं...

संविधानातूनच आपल्याला मिळते
प्रचंड ऊर्जा आणि परिवर्तनाची हिंमत...

संविधानच जोडत असतं माणूस-माणसाशी
आणि घडवत असतं समतायुक्त समाज...

संविधान मनात आणि धर्म घरात ठेवून,
खांद्याला खांदा लावून उभे राहू
आणि कायम ठेवूया
**मानवतेसाठीचा**
एक सुंदर प्रवास...

